AC –
Item No. –

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| **Syllabus for Basket of Minor** | |
|---|---|
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **साहित्यप्रकार : नाटक** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-25** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course :**<br><br>**Including but Not limited to :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांमध्ये पदवीस्तरावर अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांत मिळून Minor Course या शीर्षकांतर्गत १८ ते २० क्रेडिट्स प्राप्त करणे अनिवार्य आहे. मराठी विषय Major Course म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांशिवाय अन्य विषयांच्या आणि विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाचे Minor Courses अध्ययनसाठी उपलब्ध असतील. कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेत पदवीस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठी विषयाच्या Minor Courses चे १८ ते २० क्रेडिट्स प्राप्त केलेले असतील तर त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रमुख विषयासोबत 'मराठी Minor' ही पदवी प्रदान केली जाईल. तसेच ते विद्यार्थी मराठी विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेण्यास पात्र ठरतील.<br>उपरोक्त Minor अभ्यासक्रमाचे स्वरूप लक्षात घेऊन उत्तरोत्तर विकसित (Progressive) होत जाणाऱ्या साहित्यकेंद्री अभ्यासपत्रिकांची सुरुवात म्हणून दुसऱ्या सत्रात 'साहित्यप्रकार : नाटक' या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन समाविष्ट केले आहे. या अभ्यासपत्रिकेतून नाटक या साहित्यप्रकाराचे तात्त्विक विवेचन आणि प्रत्यक्ष नाट्य साहित्यकृतीचा परिचय व्हावा हे अपेक्षित आहे. या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाटक हा साहित्यप्रकार व नाट्य साहित्याविषयीची जाण विकसित होईल, हे लक्षात घेऊन प्रस्तुत अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |
| 7 | **Course Objectives** :<br>१. नाटक या साहित्यप्रकाराची संकल्पना समजावून सांगणे.<br>२. नाटक या साहित्यप्रकाराच्या स्वरूप-वैशिष्ट्यांचा आणि नाटकातील घटकांचा परिचय करून देणे.<br>३. नाट्य संहिता आणि नाट्य प्रयोग या दोन अंगांचा परिचय करून देणे.<br>४. प्रत्यक्ष नाट्य संहिता समजावून देणे.<br>५. विद्यार्थ्यांना नाटकाचे रसग्रहण व विश्लेषण करता येणे. | |


| | |
|---|---|
| **8** | **Course Outcomes** :<br>१. नाटक या साहित्यप्रकाराची संकल्पना समजेल.<br>२. नाटक या साहित्यप्रकाराच्या स्वरूप-वैशिष्ट्यांचा आणि नाटकातील घटकांचा परिचय होईल.<br>३. नाट्य संहिता आणि नाट्य प्रयोग या दोन अंगांचा परिचय होईल.<br>४. प्रत्यक्ष नाट्य संहिता समजून घेता येईल.<br>५. विद्यार्थ्यांना नाटकाचे रसग्रहण व विश्लेषण करता येईल. |

| | |
|---|---|
| **9** | **Modules (अभ्यास घटक)** : |
| | **Module 1 (घटक- १) : नाटक या साहित्यप्रकाराचे तात्त्विक विवेचन** |
| | १. नाटक या साहित्यप्रकाराची संकल्पना.<br>२. नाटकाची दोन रूपे : संहिता व प्रयोग.<br>३. नाटकाच्या संहितेतील घटक : विषयसूत्र, संविधानक (कथानक), पात्र, संवाद, भाषा, काल-अवकाश, रंगसूचना.<br>४. नाटकाचे प्रकार : शोकात्मिका, सुखात्मिका, प्रहसन (फार्स), अतिरंजित नाट्य (मेलोड्रामा).<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **Module 2 (घटक-२) : नाट्य साहित्यकृती** |
| | सेलिब्रेशन! (नाटक) : लेखक-प्रशांत दळवी<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| **10** | **Text Books** :<br>सेलिब्रेशन! (नाटक) ; प्रशांत दळवी ; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००४. |

| | |
|---|---|
| **11** | **Reference Books:**<br>१. वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश; (संपा०)प्रभा गणोरकर आणि अन्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००१.<br>२. मराठी वाङ्मयकोश : खंड -४ (समीक्षा-संज्ञा); (संपा०) विजया राज्याध्यक्ष; म० रा० सा० सं० मंडळ, मुंबई, २००२.<br>३. नाटक : एक वाङ्मयप्रकार; दत्ता भगत; यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००२.<br>४. भारतीय प्रयोगकलांचा परिचय व इतिहास : नाट्य; राजीव नाईक, प्रवीण भोळे; लोकवाङ्मयगृह, मुंबई, २०१०.<br>५. मराठी नाट्यकोश; (संपा०) वि० भा० देशपांडे; निशांत प्रकाशन, पुणे.<br>६. नाटक आणि रंगभूमी परिभाषासंग्रह; विलास खोले; म० रा० सा० सं० मंडळ, मुंबई, २०२०. |

| | | |
|---|---|---|
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination Individual Passing in Internal and External Examination : 60%** |
| **13** | **Continuous Evaluation through :**<br>अंतर्गत मूल्यमापन : २० गुण<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियत कार्य (Assignment) सादरीकरण / प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | |
| **14** | **Format of Question Paper (बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप):**<br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. | |

**Signatures of Team Members**

| अनुक्रमांक | नाव | समिती सदस्य | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. सतीश कामत | अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ |  |
| २. | प्रा. संजयकुमार इंगोले | समन्वयक | |
| ३. | डॉ. अनिल सपकाळ | सदस्य | |
| ४. | डॉ. नीतिन आरेकर | सदस्य | |
| ५. | डॉ. शीतल पावसकर-भोसले | सदस्य | |
| निमंत्रित विषय तज्ज्ञ | | | |
| ६. | डॉ. गोविंद काजरेकर | सदस्य | |
| ७. | डॉ. अश्विनी तोरणे | सदस्य | |
| ८. | डॉ. रवींद्र सोमोशी | सदस्य | |
| ९. | प्रा. गौतम ब्रह्मे | सदस्य | |